ePaper

# निलेश लंकेंनी लोकसभेसाठी अखेर राजीनामा दिला!



|| वर्ष - 7 । अंक - 310 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- आपल्या खेळाडूंचा आदर केला पाहिजे
- रजनीकांत यांचा जबरदस्त लूक
- ५ हजार भारतीयांना बनवलं गुलाम
- वंचितच्या पाठीत खंजीर खुपसला

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 30 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## लोकसभा निवडणूक: विलास लांडेंसारख्या दमदार इच्छुकांनाही डावलले

# बालेकिल्ल्यातच अजितदादांना उमेदवार आयात का करावा लागला?

### » अजितदादांच्या समोर अमोल कोल्हेंचा पराभव करणे, हे मुख्य कारण

। पिंपरी । महाईन्यूज

**दुभंगण्यापूर्वी एकसंध राष्ट्रवादीचासुद्धा पुणे जिल्हा बालेकिल्ला होता आणि आहे. कारण त्यांचे संस्थापक अध्यक्ष या जिल्ह्यातील आहेत. पक्ष फुटला, तरी जिल्ह्यात त्याची ताकद मोठी आहे. एकसंध पक्षाचे तेथे चारपैकी दोन खासदार आहेत, तर शिरूरला सहापैकी पाच आमदार आहेत. युतीसह आघाडीनेही या वेळी काही आमदारांचे प्रमोशन करीत त्यांना खासदारकीची संधी दिली. मात्र, शिरूर त्याला अपवाद राहिला. तेथे युतीतील राष्ट्रवादीने आपल्या सर्व चार मातब्बर आमदारांना लायक असूनही लोकसभेला संधी दिली नाही, याचे आश्चर्य आहे. एवढेच नाही, तर भोसरीचे माजी आमदार विलास लांडेंसारख्या दमदार इच्छुकांनाही त्यांनी का डावलले याचे कुतूहल आहे.**






पक्षात मातब्बर दावेदार असताना राष्ट्रवादीने शिरूरला आयात उमेदवार (शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील) दिला, त्यामागे फक्त अजित पवारांनी कोल्हेंना पराभूत करण्याचे दिलेले चॅलेंज असल्याचे दिसून आले आहे. कारण कोल्हेंच्या पराभवातून शरद पवारांचाही तो नैतिकदृष्ट्या होणार आहे. कारण कोल्हे हे त्यांचे फाइंड आहे. तसेच त्यांनी साथ सोडल्याने अजितदादांचा त्यांच्यावर डूख आहे. म्हणून त्यांचा पराभव करणे, हे मुख्य कारण उमेदवार आयात करण्यामागे आहे.

आढळराव हे तीन वेळा शिरूरचे खासदार राहिलेले आहेत. त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. तेच कोल्हेंचा पराभव करू शकतात, अशी खात्री पटल्याने अजितदादांनी आपले आमदार आणि मंत्र्यांनाही (दिलीप वळसे-पाटील) डावलून आढळरावांना तिकीट दिले आहे.

#### `शिरूर`मधील आमदारही खासदारकीच्या प्रमोशनला इच्छुक का नाहीत -

इतर ठिकाणी आमदार हे खासदारकीसाठी एका पायावर तयार असतात. पण शिरूरमध्ये ते दिसत नाही. कारण तेथील आमदारकीची व त्यातून मिळणाऱ्या मंत्रिपदाची सुभेदारी, वतनदारी अनेकांना सोडायची नाही. म्हणून आजारपणाचे कारण दिलीप वळसेंनी खासदारकी नको यासाठी दिले. त्यात सध्या राज्यात कॅबिनेट मंत्री आहेत. पुन्हा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडून येण्याची शक्यता असली, तरी त्यांनी ती आताच नाही, तर गेल्यावेळीही खासदारकीची संधी सोडलेली आहे. खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील हेसुद्धा दिल्लीत जाण्यासाठी एकदम फिट आहेत. पण, त्यांनाही राज्यात मंत्री बनण्याची इच्छा आहे. त्यामुळे त्यांनीही खासदारकीत रस दाखवलेला नाही.

दुसरीकडे पक्ष फुटल्यानंतर काहीकाळ कुंपणावर राहिल्याने जुन्नरचे आमदार अतुल बेनके आणि हडपसरचे चेतन तुपे यांना याबाबत पक्ष विचारेल, याची शक्यताच नव्हती. तर भोसरीचे आमदार महेश लांडगे जरी तयारीत असले, तरी ते भाजपचे आहेत. राष्ट्रवादीकडून ते लढण्याची सुतराम शक्यता नव्हती व नाही. लांडे हे मागे खासदारकीला हरले असल्याने त्यांचा विचार या वेळी पुन्हा केला गेला नसावा. ते कोल्हेंविरुद्ध निवडून येतील की नाही, याविषयी अजितदादांना शंका वाटत असल्याने त्यांनी मोठा दावा करूनही त्यांना दिल्लीची संधी दिली गेली नाही.

### बारणेंना हॅटट्रिकची संधी

» महायुतीतील तिन्ही पक्षांनी दावा ठोकल्याने पेच निर्माण झालेल्या मावळची जागा अखेर शिवसेनेलाच सुटली. तेथे पुन्हा श्रीरंग बारणेच हेच उमेदवार असल्याचे स्पष्ट झाले. आता या मतदारसंघातून बारणे खासदारकीची हॅटट्रिकच करतात की ही संधी त्यांच्याकडून हुकते? हे पाहावे लागणार आहे. बारणे हे मावळमधून 2014 आणि 2019 असे सलग दोनदा निवडून आलेले आहेत. हा मतदारसंघ निर्माण झाला तेव्हा म्हणजे 2009ला तेथील पहिले खासदार हे शिवसेनेचेच गजानन बाबर होते. तर, मावळ विधानसभा मतदारसंघात सुद्धा अद्याप कुणाचीही आमदारकीची हॅटट्रिक झालेली नाही. त्यामुळे बारणेंची ती खासदारकीची झाली, तर तो या मतदारसंघातील विक्रम होणार आहे.

# नाराजांसाठी फडणवीसांची धावाधाव!

## शिरूर लोकसभा मतदारसंघातील नाराजांची मनधरणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीमधील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या दृष्टीने प्रतिष्ठेच्या झालेल्या बारामती आणि शिरूर लोकसभा मतदारसंघातील नाराजांची मनधरणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धावाधाव करावी लागत आहे.**



बारामती लोकसभा मतदारसंघातील पुरंदरचे शिवसेनेचे माजी आमदार विजय शिवतारे, इंदापूरचे भाजप नेते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, दौंडचे आमदार राहुल कुल यांच्यासह शिरूरमधून अपक्ष म्हणून निवडणूक उभे राहण्याची शक्यता असलेले मंगलदास बांदल यांच्यासमवेत फडणवीस यांनी चर्चा करून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या संभाव्य उमेदवार आहेत. मात्र शिवतारे आणि हर्षवर्धन पाटील यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पवार यांना विरोध सुरू केला आहे. भविष्यातील राजकीय समीकरणे जुळविण्यासाठी या दोघांचा विरोध आहे. त्यामुळेच त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे.काही दिवसांपूर्वी हर्षवर्धन पाटील यांची आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली होती. या भेटीनंतर पाटील महायुतीच्या प्रचारात उतरतील, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र त्यानंतरही पाटील यांची नाराजी कायम राहिली. आगामी विधानसभा निवडणुकीत पाटील यांना इंदापूरमधून उमेदवारी हवी आहे. तसे आश्वासन मिळाले, तरच प्रचारात सक्रिय होणार असल्याचे पाटील सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी त्यांच्या दोनशे समर्थक कार्यकर्त्यांसह मुंबईत फडणवीस यांची भेट घेतली. मूळचे राष्ट्रीय समाज पक्षाचे असलेले आणि सध्या भाजपमध्ये असलेले दौंडचे आमदार राहुल कुल यांच्याकडूनही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.अजित पवार आणि शरद पवार यांच्यासोबत संघर्ष करण्यात बराच काळ घालवला. आता महायुतीमध्ये एकत्र काम करावे लागत असल्याने कुल नाराज आहेत. त्यामुळे त्यांनी पत्नी कांचन कुल यांच्यासह फडणवीस यांची भेट घेतली. मात्र त्यांची नाराजी फडणवीस यांनी दूर केल्याची चर्चा आहे. भोसरीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विलास लांडे शिरूर लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी इच्छुक होते. मात्र शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देऊन त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यामुळे लांडे नाराज असून ते शरद पवार यांना साथ देणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांना त्यांची मनधरणी करावी लागत आहे.स्थानिक नेते मंगलदास बांदल यांनी शिरूरमधून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर बांदल यांनाही फडणवीस यांनी बोलावून घेत चर्चा केली. बांदल यांनी त्याला दुजोरा दिला. मात्र तपशील जाहीर करण्यास नकार दिला. राज्यातील किंबहुना जिल्ह्यातील राजकारणाची सूत्रे हाती आल्यानंतर अजित पवार यांनी विरोधकांसाठी घेतलेल्या टोकाच्या भूमिकेचे पडसाद जिल्ह्यातील राजकारणात उमटण्यास सुरुवात झाल्याने मात्र आता त्यांच्या मनधरणीसाठी धावाधाव करावी लागत आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, दौंडचे आमदार राहुल कुल यांच्यासह शिरूरमधून अपक्ष म्हणून निवडणूक उभे राहण्याची शक्यता असलेले मंगलदास बांदल यांच्यासमवेत फडणवीस यांनी चर्चा करून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

### हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी हवी

मात्र शिवतारे आणि हर्षवर्धन पाटील यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पवार यांना विरोध सुरू केला आहे. भविष्यातील राजकीय समीकरणे जुळविण्यासाठी या दोघांचा विरोध आहे. त्यामुळेच त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे.काही दिवसांपूर्वी हर्षवर्धन पाटील यांची आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली होती. या भेटीनंतर पाटील महायुतीच्या प्रचारात उतरतील, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र त्यानंतरही पाटील यांची नाराजी कायम राहिली. आगामी विधानसभा निवडणुकीत पाटील यांना इंदापूरमधून उमेदवारी हवी आहे. तसे आश्वासन मिळाले, तरच प्रचारात सक्रिय होणार असल्याचे पाटील सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी त्यांच्या दोनशे समर्थक कार्यकर्त्यांसह मुंबईत फडणवीस यांची भेट घेतली. मूळचे राष्ट्रीय समाज पक्षाचे असलेले आणि सध्या भाजपमध्ये असलेले दौंडचे आमदार राहुल कुल यांच्याकडूनही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.अजित पवार आणि शरद पवार यांच्यासोबत संघर्ष करण्यात बराच काळ घालवला.

# आचारसंहितेमुळे रिंगरोडच्या भूसंपादनाला ब्रेक

## 34 पैकी 31 गावांमधील 644 हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळाने (एमएसआरडीसी) १७२ किलोमीटर लांब आणि ११० मीटर रुंदीचा रिंगरोड हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.**



दोन टप्प्यात हा प्रकल्प राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात पश्चिम मार्गावरील भोरमधील पाच, हवेलीतील ११, मुळशीतील १५ आणि मावळातील सहा गावांचा समावेश असून एकूण ६५० हेक्टर जागेचे भूसंपादन करण्याचे नियोजित आहे. त्यानुसार ३४ पैकी ३१ गावांमधील ६४४ हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले आहे. त्यासाठी २९७५ कोटींचा निधी देखील वितरीत करण्यात आला आहे. लोकसभेची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात राज्याचे वित्तमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी रिंगरोडच्या भूसंपादनासाठी तब्बल दहा हजार ५१९ कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे संमतीपत्र दिलेल्या गावातील शेतकऱ्यांचे निवाडे, नोटीस दिलेल्या शेतकऱ्यांकडून संमतीपत्र आणि मुदत संपल्यानंतर सक्तीने भूसंपादन आदी प्रक्रियेला आचारसंहितेपूर्वी वेग आला होता. मात्र, निवडणुकीच्या कामांमुळे वेळ लागणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सुचीत करण्यात आले आहे.जिल्ह्यातील पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघांसाठी दोन टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळे सर्व महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामकाजातील जबाबदारी देण्यात आली आहे. तालुका पातळीवर तहसीलदार, उपविभागीय अधिकारी निवडणूक कामांमध्ये व्यस्त आहेत.

### रिंगरोडचे भूसंपादन खोळंबले

सर्व कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामकाजातील जबाबदारी देण्यात आली आहे. ६ जूनपर्यंत आचारसंहिता लागू असल्याने या अधिकाऱ्यांना प्रशासकीय दृष्टीकोनातून केवळ निवडणुकीच्याच कामांवर लक्ष केंद्रीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आचारसंहिता लागू झाल्यानंतर महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक विषयक कामे देण्यात आली आहेत. परिणामी रिंगरोडचे भूसंपादन खोळंबले आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया पूर्ववत होण्यासाठी आचारसंहिता संपण्याची वाट पाहावी लागणार आहे.

# 'गोविंदाचे स्वागत अन् मला नाटक्या!

## डॉ. अमोल कोल्हेंचे शिवाजीराव आढळराव पाटलांना प्रत्युत्तर, मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंदी सिनेसृष्टीतीला अभिनेता गोविंदा शिवसेनेत आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे स्वागत करत कलाकार हा कलाकार असतो. त्याचा अपमान करणाऱ्याला जनता धडा शिकवेल, असे म्हटले होते. गोविंदांचे स्वागत आणि छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका करुन आपला जाज्वल्य इतिहास, खरा इतिहास पोहोचवणाऱ्या माझ्या सारख्याच्या बाबतीत मुख्यमंत्री शिंदे यांचे पूर्वाश्रमीचे सहकारी आणि आती ज्यांनी पक्ष बदलला ते शिवाजीराव आढळराव पाटील हे नाटक्या, नौटंकी म्हणत हिणवतात अशी खंत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केली. तसेच कलाकारांची कदर केल्याने मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.**



खासदार डॉ. कोल्हे म्हणाले, की गेली काही वर्षे सातत्याने शिरूर लोकसभा मतदार संघातल्या जनतेने माझ्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील अभिनय क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तीला लोकसभेत निवडून दिले. त्यानंतर शेलक्या शब्दांमध्ये जे कायम हिणवल जात होते. मग नाटक्या असेल, नौटंकी असेल आणि खरोखर मग प्रश्न पडतो. हिंदी सिनेसृष्टीतला सिनेस्टार आला तर मग त्यांचे स्वागत आणि छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका करुन आपला जाज्वल्य इतिहास, खरा इतिहास पोहोचवणाऱ्या माझ्या सारख्याच्या बाबतीत मुख्यमंत्री शिदे यांचे पूर्वाश्रमीचे सहकारी आणि आता ज्यांनी पक्ष बदलला ते सातत्याने अशी टीका टिप्पणी करतात.

त्यामुळे मुखमंत्री शिंदे यांचे मनापासून आभार व्यक्त केले. आता त्यांनी हे जे समन्वयाची महत्वाची बाब आहे. ती त्यांच्या ही निदर्शनास आणून द्यावी. अभिनेता गोविंदा एकदा खासदार होते. तेव्हाचा त्यांची कामगिरी बघावी. आणि मला थोडीशी पातळी सोडून नाटक्या अशा शब्दात जर कोणी हिणवत असेल त्यांनी २०१९ ते २०१४ यामधला माझी संसदेतील कामगिरी तपासून पाहावी. पहिल्याच वेळी तब्बल तीन वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाल्यानंतर शिरूर मतदार संघाचे अनेक प्रश्न हे मार्गी लावल्यानंतर कोण अशा पद्धतीने टीका करत असेल तर त्यातून ज्याची त्याची संस्कृती दिसते. यापलीकडे काय बोलणार असे म्हणत डॉ. कोल्हे यांनी नाव न घेता राष्ट्रवादीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले.

**त्याचबरोबर संसद रत्न पुरस्कारावरून अमोल कोल्हे यांच्यावर टीका करणाऱ्या शिवाजी आढळराव पाटील यांच्यावर देखील अमोल कोल्हे यांनी टीका केली. शिवाजी आढळराव पाटील हे तीन टर्म खासदार होते. त्यांनी अशा पद्धतीने बोलणं योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले.**

### साहजिकच विलास लांडे नाराज होतील—अमोल कोल्हे

» दांडगा जनसंपर्क आणि सातत्यपूर्ण काम करणाऱ्या नेतृत्वाला डावलून ज्या व्यक्तीच्या विरोधात वीस वर्षे संघर्ष केला, तोच उमेदवार राष्ट्रवादीने शिरूर लोकसभेच्या माध्यमातून लादल्याने इच्छुक उमेदवार विलास लांडे हे नाराज होणं स्वाभाविक असल्याचं शरद पवार गटाचे उमेदवार, विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांनी म्हटलं आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी विलास लांडे यांच्या नाराजीवर स्पष्ट मत मांडले. अमोल कोल्हे यांनी आज शिरूर लोकसभेचा भाग असलेल्या भोसरीमध्ये सुट्ट्यांच औचित्य साधून मतदारांपर्यंत पोहोचत प्रचार केला.

शिरूर लोकसभा मतदारसंघात अमोल कोल्हे यांच्या विरोधात राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून कोण उमेदवार असणार यावर अनेक चर्चा झाल्या. अखेर शिवसेना शिंदे गटातून थेट राष्ट्रवादीत प्रवेश करणारे शिवाजी आढळराव पाटील हेच शिरूर लोकसभेचे उमेदवार असतील यावर जवळपास शिक्कामोर्तब झाला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा २०१९ ची पुनरावृत्ती होणार असून विद्यमान खासदार अमोल कोल्हे विरुद्ध माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील अशी लढत बघायला मिळणार आहे. यामुळे अजित पवार गटातील इच्छुक उमेदवार विलास लांडे हे मात्र नाराज असल्याची जोरदार चर्चा आहे.

२०१९ ला ऐनवेळी माझ्यासाठी पक्षाने सांगितल्यानंतर माघार घेतली, माझ्यासाठी ते खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. विलास लांडे यांचा दांडगा जनसंपर्क असून सातत्यपूर्ण काम करणारे नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. मात्र गेल्या वीस वर्षांपासून ज्या व्यक्तींच्या विरोधात विलास लांडे हे काम करत आहेत. त्याच व्यक्तीला शिरूर लोकसभेतून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. त्यांना राष्ट्रवादीने आयात केले आहे. असं असल्यास विलास लांडे हे नाराज होणं स्वाभाविक असल्याचं मत अमोल कोल्हे यांनी व्यक्त केलं.

# जिल्ह्यात 72 टक्के लोकांचा मोबाईल क्रमांक शिधापत्रिकेला लिंक

## शिधापत्रिकेवरील धान्याची माहिती मिळणार मोबाइलवर


। पिंपरी चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिधापत्रिकेवरील धान्य नेमून दिलेल्या प्रमाणात मिळतेय, याची अनेकांना खात्री नसते. तुमच्यासाठी ठरलेल्या धान्याच्या कोटा आणि तुम्ही किती धान्य घेतले, याचा 'एसएमएस' देण्यासाठी रेशनकार्डाला मोबाइल क्रमांक जोडण्याची मोहीम सुरू आहे. पुणे जिल्ह्यात 72 टक्के रेशनकार्डांना मोबाइल क्रमांक जोडला आहे.**

जिल्ह्यात 6 लाख 11 हजार 880 रेशनकार्डधारक असून त्यापैकी 4 लाख 42 हजार 338 रेशनकार्डला मोबाइल क्रमांक जोडला. याची टक्केवारी 72.29 आहे.

धान्य घेतल्याचा एसएमएस मिळाल्याने तुमच्या हक्काचे धान्य तुम्हालाच मिळाले, याची खात्री होईल. त्यामुळे रेशन दुकानदारांकडून होणाऱ्या मापात पापाचे वाटेकरी कोण, हे कळू शकेल. परिणामी, ग्राहकांच्या तक्रारी कमी होतील.



### मोबाइल क्रमांक जोडण्यासाठी

» सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व रेशनकार्डधारकांनी स्वस्त धान्य दुकानदारांकडून धान्य घेताना आपला मोबाइल क्रमांक ई-पॉस मशिनमध्ये अंगठ्याचा ठसा देऊन अद्ययावत करावा. त्यानंतर कार्डधारकांना किती (CHINCHWAD) धान्य मिळाले, याचा संदेश त्यांच्या मोबाइलवर मिळेल.

जिल्हा पुरवठा अधिकारी प्रशांत आवटे म्हणाले, "शिधापत्रिकांना शिधापत्रिका धारकांचा मोबाइल क्रमांक जोडण्याचे काम सुरू आहे. त्यात शिधापत्रिकेवरील किमान एकाचा तसेच सर्व सदस्यांचे मोबाइल क्रमांक जोडत आहेत. नागरिकांनी आपल्या रेशनकार्डावरील सर्व सदस्यांचे मोबाइल क्रमांक जोडून घ्यावेत."




# पैसे नसलेल्या अर्थमंत्री

**अगदी मन लावून देशाच्या अर्थकारणाचा गाडा हाकणाऱ्या आपल्या निर्मलाताई खरंच खूप प्रामाणिक आहेत हो! पैसे नाहीत म्हणून लोकसभा लढणार नाही असे स्पष्ट सांगायची हिंमत त्यांनी दाखवली. काय म्हणता? पक्षाजवळ इतका पैसा असताना त्या असे कसे म्हणू शकतात? अरे बाबा, तो पक्षाचा पैसा आहे, त्यांचा नाही.**

भलेही त्यांच्या अखत्यारीत असलेल्या ईडी व आयकर खात्याने श्रीमंतांच्या दारावर टकटक केल्यावर रोख्याच्या माध्यमातून तो जमा झाला असेल. तसेही ताई विकासासाठी आवश्यक असलेल्या आकडयांची जुळवाजुळव करण्यात इतक्या गर्क असतात की त्यांनी निवडणूक रोख्याशी संबंधित एकही बातमी कदाचित वाचली नसेल. त्यामुळे स्वत:कडे पैसे नसले तरी पक्ष खर्च करू शकतो याची त्यांना कल्पना नसेल. तेव्हा त्यांच्या प्रामाणिक विधानावर चर्वितचर्वण करण्याआधी या शक्यतांवर विचार करा. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनकडे झेपावत असताना अर्थमंत्री इतक्या गरीब कशा, असले फालतू प्रश्न तर अजिबात नकोत. साधी राहणी व उच्च विचारसरणी हेच ताईंच्या आयुष्याचे ध्येय राहिले आहे. नेमके त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या विधानातून उमटले. त्यामुळे इतरांना पोटशूळ उठण्याचे काही कारण नाही. त्यांच्या या विधानामुळे निवडणूक लढायला खूप पैसा लागतो हे सत्य अधोरेखित झाले,




असा तर्क काढायचीही गरज नाही. हे वक्तव्य करताना त्यांच्यासमोर आयोगाने खर्चमर्यादेसाठी निश्चित केलेला ९५ लाख हाच आकडा होता. अगदी बालाजीची शपथ!सलग दहा वर्षे केंद्रात मंत्री राहूनही त्या इतक्या गरीब कशा राहिल्या हा प्रश्नही निरर्थक आणि मंत्रीपद म्हणजे कमाईचे साधन या आजवर रुजलेल्या काँग्रेसी वृत्तीतून आलेला. नेमकी हीच वृत्ती बाद ठरवण्याचा प्रयत्न विश्वगुरूंनी सातत्याने केला. त्याचे फलित म्हणजे पदावर राहूनसुद्धा ताईंनी जपलेला प्रामाणिकपणा. त्यामुळे त्यांच्या विधानाचे स्वागत करायचे सोडून त्यावर नाक मुरडणारे देशद्रोहीच. पक्षाच्या तिजोरीत साडेसहा हजार कोटी जमा झाल्याची गोष्ट देशभर झाली असताना त्यांनी पैसे नाहीत म्हणून लढत नाही असे म्हणणे म्हणजे पक्षाची नाचक्कीच असे अजब तर्कट मांडणाऱ्यांचा तर त्रिवार निषेध! पैसा आहे म्हणून तो उधळायचा थोडाच असतो? एकदा तिजोरीत गेला की तो 'अचल'. निवडणुका वगैरे 'चल' स्वरूपाच्या. त्यामुळे ताईंनी पक्षाला अडचणीत आणले वगैरे काही नाही.

इतकी वर्षे राजकारणात राहूनसुद्धा त्यांना जनाधार निर्माण करता आला नाही. लोकांचे प्रेम मिळवत एखादा मतदारसंघ बांधता आला नाही. जनतेचा पाठिंबा मिळवता आला नाही. त्यासाठी लोकांमध्ये मिसळावे लागते, तेही त्यांनी केले नाही अशी नकारात्मक मांडणी तर नकोच. एकीकडे हे केले नाही व दुसरीकडे त्या पैसे नसल्याचा आव आणत आहेत हेसुद्धा चूक. देशसेवेत व्यस्त राहिल्यामुळे त्यांना जनतेचा पाठिंबा व सनदशीर मार्गाने पैसा कमावण्यासाठी वेळच मिळाला नाही हेच खरे. त्यामुळे सरकारची प्रतिमा आणखी उजळ करणाऱ्या त्यांच्या या वक्तव्याचे सर्वांनी समर्थन करायला हवे.देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनकडे झेपावत असताना अर्थमंत्री इतक्या गरीब कशा, असले फालतू प्रश्न तर अजिबात नकोत. साधी राहणी व उच्च विचारसरणी हेच ताईंच्या आयुष्याचे ध्येय राहिले आहे. नेमके त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या विधानातून उमटले. त्यामुळे इतरांना पोटशूळ उठण्याचे काही कारण नाही. त्यांच्या या विधानामुळे निवडणूक लढायला खूप पैसा लागतो हे सत्य अधोरेखित झाले, असा तर्क काढायचीही गरज नाही. हे वक्तव्य करताना त्यांच्यासमोर आयोगाने खर्चमर्यादेसाठी निश्चित केलेला ९५ लाख हाच आकडा होता. अगदी बालाजीची शपथ!सलग दहा वर्षे केंद्रात मंत्री राहूनही त्या इतक्या गरीब कशा राहिल्या हा प्रश्नही निरर्थक आणि मंत्रीपद म्हणजे कमाईचे साधन या आजवर रुजलेल्या काँग्रेसी वृत्तीतून आलेला. नेमकी हीच वृत्ती बाद ठरवण्याचा प्रयत्न विश्वगुरूंनी सातत्याने केला. अगदी मन लावून देशाच्या अर्थकारणाचा गाडा हाकणाऱ्या आपल्या निर्मलाताई खरंच खूप प्रामाणिक आहेत हो! पैसे नाहीत म्हणून लोकसभा लढणार नाही असे स्पष्ट सांगायची हिंमत त्यांनी दाखवली. काय म्हणता? पक्षाजवळ इतका पैसा असताना त्या असे कसे म्हणू शकतात? अरे बाबा, तो पक्षाचा पैसा आहे, त्यांचा नाही.

## संपादकीय »

### तापमानवाढ

*ऐंशीच्या दशकात जागतिक वार्षिक सरासरी तापमानवाढ जाणवायला लागली.*

लोकांना त्याची जाणीव जशी व्हायला लागली तसतसे माध्यमातून चर्चा व पर्यावरणाशी संबंधित सेवाभावी संस्थांनी या विषयाची मोठ्या प्रमाणात दखल घेण्यास सुरूवात केली. प्रसारमाध्यमांना देखील हा विषय महत्त्वाचा वाटला; मग एकूणच जागतिक स्तरावर याची चर्चा सुरू झाली. २०२३ हे वर्ष सर्वाधिक उष्ण ठरल्याचे आणि सरासरी १.४५ अंश सेल्सिअस तापमानवाढ नोंदवल्याचे आपण पाहिले. एकूणच निसर्गात होणाऱ्या हे बदल ज्या वेगाने घडत आहेत त्याचा विचार केल्यास सन २१००मध्ये जागतिक तापमानवाढ ही एकूण दीड अंश सेल्सिअसने वाढेल, असे गृहित धरून एकूणच उपाययोजनांबाबत तापमानवाढीसाठी कारणीभूत असणाऱ्या मिथेन उत्सर्जनाबाबत जागतिक स्तरावर ग्लोबल मिथेन इनिशिएटिव्ह (जीएमआय) या संस्थेमार्फत कोळसा खाणी, शेती आणि कचरा व्यवस्थापनातून व इतर क्षेत्रातील मिथेन उत्सर्जन कमी करण्यासाठी सरकारी उद्योग व सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून काम सुरू आहे.

मुस्लिमांविषयी आणि इस्लामविषयी जे म्हटलं गेलं, ते सगळं वाचून मन खूपच खिन्न झालं होतं. 'वाचन वेडा' नावाच्या ग्रुपमध्येही मुस्लिम समाज व इस्लामविषयीच्या मराठी पुस्तकांविषयीची एक पोस्ट ग्लोबल लाईट पब्लिशर या अकाऊंटवरून बुशरा नाहीद यांनी केली होती, त्यांनाही ट्रोल केलं गेलं.

# माणसाशी जोडणारा एक फोन नंबर...

हे सगळं होतं ते सर्वसामान्यांच्या मनात मुस्लिमांविषयी असलेल्या गैरसमजुतीतून. या गैरसमजुती असतात कारण हे दोन्ही समाज जोडणारा पूलच अस्तित्वात नाही. आणि याचाच वेगवेगळ्या गटांकडून फायदाही घेतला जातो. खरं म्हणजे जनसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयांकडे दुर्लक्ष करण्यासाठी मुस्लिम समाजाविषयी, त्यांच्या संस्कृती व विचारसरणीविषयी अपप्रचार केला जातो आहे. अशावेळी मुस्लिम समाजाविषयीच्या गैरसमजुती दूर करुन त्या अपप्रचाराचा प्रतिवाद होणे गरजेचे आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे आज मुसलमान समजून घेणे आवश्यक आहे. सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात कुणी मुसलमान समजून सांगत असेल तर तो एकप्रकारे माणसं जोडण्याचे, समाज जोडण्याचे, पर्यायाने देश जोडण्याचेच काम करत असतो.म्हणून माणसाला माणूस जोडणाऱ्यांनी या महत्कार्यासाठी संदर्भ म्हणून कुरआन किंवा पैगंबरी शिकवणीचे दाखले दिले तर अशा देशकार्य करणाऱ्यांना



धर्मांध, बुरसटलेले म्हणून हिणवू नये. यांच्याशी संबंध ठेवले तर आपले पुरोगामीत्व 'खतरे मे' येईल अशी वृथा भीती बाळगून त्यांना वैचारिक अस्पृश्य ठरवू नका. तो धर्मप्रचार नसतो, तर प्रेमप्रचार असतो, माणसं जोडण्याचा प्रयत्न असतो. तसं याबाबतीत बऱ्याच मुस्लिमांचीही चूक आहे. मुस्लिम समाज व संस्कृतीविषयी ते मराठीत फारसे व्यक्त होतांना दिसत नाहीत. काही जण मराठीत व्यक्त झाले तरी आपलं पुरोगामीत्व उजळून दिसावं म्हणून ते सुधारणांच्या नावाखाली मुस्लिमांचे खलनायिकीकरणच करतांना दिसतात. ट्रोलर्सना ते एकप्रकारे रसदच पुरवित असतात.मुस्लिम समाज व संस्कृतीविषयी सर्वांना अधिक माहिती व्हावी, त्यांच्याविषयीचे गैरसमज दूर व्हावेत आणि मना-मनांची तार जोडता यावी, याकरिता एका संस्थेने एका टोल फ्री नंबरची हेल्पलाईनच सुरू केली आहे – १८०० ५७२ ३०००. हैद्राबादच्या मेहदीपटनम परिसरात ही संस्था आहे – इस्लामिक इन्फर्मेशन सेंटर. या संस्थेतर्फे इंग्रजी, हिंदी, मराठी, तेलगू, बंगाली, ओरीया, कन्नड व तामिळ अशा आठ भाषेत इस्लामविषयी माहिती देणारे एक केंद्र चालविते जाते. प्रत्येक भाषेसाठी दोन – दोन कॉल प्रतिनिधी आठ + आठ असे दररोज सोळा तास काम करतात. उपरोक्त टोलफ्री नंबरवर डायल केल्यास अमूक भाषेसाठी अमूक नंबर दाबा, असे कस्टमर केअरच्या धर्तीवर संभाषण ऐकू येते. देशभरात प्रबोधनाद्वारे व्यवस्था परिवर्तनासाठी चळवळ राबविणाऱ्या जमाअत ए इस्लामी हिंद या संघटनेतर्फे सन २०१३ मध्ये सुरू झालेल्या या माहिती केंद्राचे वहाज हाशमी हे प्रमुख असून मतीन अहमद हे सचिव म्हणून काम पाहतात. लोकवर्गणीतून या संस्थेचे कार्य चालते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वंचितच्या पाठीत खंजीर खुपसला!

## आंबेडकरांचा आघाडीतून बाहेर पडत 'एकला चलो रे'चा नारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. तर दुसऱ्या बाजूला, शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार आणि महाविकास आघाडीचे नेते संजय राऊत सातत्याने दावा करत आहेत की आम्ही (मविआ) वंचित बहुजन आघाडीला आमच्याबरोबर घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.**



तसेच प्रकाश आंबेडकर यांच्यावर आमचा विश्वास आहे. आमचे आणि त्यांचे विचार सारखेच आहेत.आम्हाला आणि आंबेडकरांना देशाचं संविधान वाचवायचं आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाजपाला मदत होईल असं वागणार नाहीत. आमची प्रकाश आंबेडकरांशी अजूनही चर्चा चालू आहे.संजय राऊत अजूनही आघाडी मजबूत असल्याचा दावा करत असतानाच प्रकाश आंबेडकर यांनी थेट संजय राऊत यांनाच लक्ष्य केलं आहे. आंबेडकरांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये संजय राऊत वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत चाकू खुपसत आहेत असं चित्र दाखवण्यात आलं आहे. तसेच त्यांनी म्हटलं आहे की, संजय राऊत, तुम्ही किती खोटं बोलणार? तुम्ही म्हणताय की तुमचे आणि आमचे विचार एकसारखे आहेत तर मग तुमच्या बैठकांमध्ये तुम्ही आम्हाला का बोलवत नाही? ६ मार्च रोजी फोर सीझन्स हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला आमंत्रित का केलं नाही? तुम्ही आजही वंचितला आमंत्रित न करता बैठक बोलावली आहे, आमच्याशिवाय बैठक का करताय? तुम्ही तर मित्राच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचं काम केलं आहे. सिल्व्हर ओकवर झालेल्या बैठकीत तुम्ही काय भूमिका घेतली होती ते आम्हाला माहिती आहे. अकोल्यात आमच्याविरोधात उमेदवार उभा करण्याबाबत तुम्ही मुद्दा उपस्थित केला होता हे खरं नाही का? एका बाजूला आघाडी बनवत असल्याचं चित्र निर्माण करताय आणि दुसऱ्या बाजूला आम्हालाच पाडण्याचा कट रचताय,प्रकाश आंबेडकर यांच्या या आरोपांना संजय राऊत यांनी आज (२९ मार्च) प्रत्युत्तर दिलं. राऊत यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, आमची लढाई ही संविधानाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांच्या विरोधात आहे. प्रकाश आंबेडकर जे काही बोलत आहेत त्याच्याशी माझा काहीच संबंध नाही. आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र बसलो. प्रकाश आंबेडकर आणि त्यांच्या पक्षाच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. अनेक बैठका केल्या, या बैठकांमध्ये वंचितचे प्रतिनिधी आणि काही वेळा स्वः प्रकाश आंबेडकर उपस्थित होते. आम्ही आता प्रकाश आंबेडकर यांना लोकसभेच्या पाच जागा देण्याचा प्रस्ताव दिला आहे. आता त्यावर प्रकाश आंबेडकर यांनी निर्णय घ्यायचा आहे.संजय राऊत म्हणाले, प्रकाश आंबेडकर कालपर्यंत नाना पटोलेंवर आरोप करत होते. आता माझ्याबद्दल बोलतायत, त्यांना आता मी काय बोलणार... परंतु, मला विश्वास आहे की प्रकाश आंबेडकर संविधानाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांच्या बाजूने जाणार नाहीत. त्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत करणार नाहीत. महाविकास आघाडीने आतापर्यंत प्रत्येक बैठकीत प्रकाश आंबेडकर आणि त्यांच्या पक्षाला आमंत्रित केलं आहे. तुम्ही माध्यमांनीदेखील ते पाहिलं असेल की अनेक बैठकांनंतर वंचितच्या नेत्यांनी आणि प्रकाश आंबेडकर यांनी स्वतः तुमच्याशी बातचीत केली आहे. त्यांचा पक्ष केवळ काल (२८ मार्च) झालेल्या बैठकीत सहभागी झाला नाव्हता.

### आम्हांला आमंत्रित का केलं नाही?

» परंतु, त्या बैठकीतही त्यांच्याविषयी चर्चा झाली. प्रकाश आंबेडकरांसाठी आणखी जास्त काय करता येईल यावरही चर्चा करण्यात आली.प्रकाश आंबेडकर यांच्यावर आमचा विश्वास आहे. आमचे आणि त्यांचे विचार सारखेच आहेत. आम्हाला आणि आंबेडकरांना देशाचं संविधान वाचवायचं आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाजपाला मदत होईल असं वागणार नाहीत. आमची प्रकाश आंबेडकरांशी अजूनही चर्चा चालू आहे.संजय राऊत अजूनही आघाडी मजबूत असल्याचा दावा करत असतानाच प्रकाश आंबेडकर यांनी थेट संजय राऊत यांनाच लक्ष्य केलं आहे. आंबेडकरांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये संजय राऊत वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत चाकू खुपसत आहेत असं चित्र दाखवण्यात आलं आहे. तसेच त्यांनी म्हटलं आहे की, संजय राऊत, तुम्ही किती खोटं बोलणार? तुम्ही म्हणताय की तुमचे आणि आमचे विचार एकसारखे आहेत तर मग तुमच्या बैठकांमध्ये तुम्ही आम्हाला का बोलवत नाही? ६ मार्च रोजी फोर सीझन्स हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला आमंत्रित का केलं नाही?

# छ. संभाजीनगरात मराठा समाजाच्या बैठकीत हाणामारी

## राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाचा विषय पुन्हा एकदा तापला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाचा विषय तापला आहे. राज्य सरकारने अधिसूचना काढून मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिलं आहे.**

तर दुसऱ्या बाजूला मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी आंदोलन आणि उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावं या मागणीवर ठाम आहेत. दरम्यान, मराठा समाज आगामी काळात अधिक तीव्रतेने आंदोलन करणार असल्याचं समाजातील कार्यकर्त्यांनी सांगितलं आहे. यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी मराठा समाजाच्या बैठका चालू आहेत. अशीच एक बैठक आज (२९ मार्च) छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत दोन गट भिडल्याचं पाहायला मिळालं. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठा समाजाची एक बैठक



बोलावली होती. या बैठकीवेळी काही जणांनी एकमेकांवर हल्ला केला. बराच वेळ दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली. दोन्ही बाजूच्या लोकांनी एकमेकांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हाणामारी करणाऱ्या दोन्ही गटांमधील कार्यकर्त्यांनी टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी एक महिला कार्यकर्ती म्हणाली, "या बैठकीद्वारे सामान्य मराठा लोकांचा आवाज दाबला जातोय. आम्ही मनोज जरांगे पाटलांबरोबर आहोत. इथे या लोकांची बैठक चालू होती. यांनी सर्वांना विश्वासात घेऊन बैठक घ्यायला हवी होती. बैठक घेण्यावरून इथे भांडण झालं." दुसऱ्या एका कार्यकर्त्याने सांगितलं की, आम्ही केवळ मराठा समाजासाठी इथे आलो आहोत. आम्हीदेखील अनेक वर्षांपासून मराठा समाजासाठी लढत आहोत. परंतु, यांनी आम्हाला बैठकीसाठी बोलावलं नाही. आम्ही मराठा समाजाचे घटक नाही का? काहीजण राजकीय पक्षाकडून सुपारी घेऊन, पैसे घेऊन इथे आले होते. समाजातील कार्यकर्त्यांना कुठल्याही प्रकारचा मेसेज मिळाला नाही.

### बैठक कोणी आयोजित केली?

» एका कार्यकर्त्याने सांगितलं की, मराठा समाजातील काही गरजवंतांनी ही बैठक आयोजित केली होती. मला या बैठकीबाबत एक संदेश मिळाला. त्यामुळे मी इथे आलो. परंतु, काही लोक ही बैठक कोणी आयोजित केली? ही बैठक कोणी बोलावली आहे? असे प्रश्न विचारत आमच्यावर तुटून पडले, काही लोकांची इथे दडपशाही चालू आहे. आम्हाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

# 5 हजार भारतीयांना बनवलं गुलाम!

## कंबोडियामध्ये भारतीय अडकले असल्याची माहिती समोर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कंबोडिया या देशामध्ये तब्बल ५ हजार भारतीय अडकले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ५ हजार भारतीयांची फसवणूक करत त्यांना नोकरी आणि इतर काही गोष्टींचे आमिष दाखवून गुलाम बनवण्यात आले आहे. या प्रकरणामध्ये अधिकारी असल्याचे भासवून लोकांची फसवणूक करत लाखो रूपये उकळल्याचा अंदाजही व्यक्त करण्यात येत आहे. कंबोडियामध्ये ५ हजारांहून अधिक भारतीयांना वेठीस धरण्यात आले असून त्यांच्याकडून चुकीचे कामे करून घेतले जात आहे. कंबोडियामध्ये अडकलेल्या भारतीयांच्या सुटकेसाठी आता केंद्र सरकारकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.**



कंबोडिया हे एक सायबर गुलामगिरीचे केंद्र मानले जाते. कंबोडियामध्ये अडकलेल्या या लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करण्यास भाग पाडले जात असून त्यांच्याकडून सायबर फसवणुसारखे कामे करून घेतले जाते. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे कंबोडियातील लोक जास्त करून भारतीयांनाच फसवत असल्याचा अंदाज आहे.भारत सरकारच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर सुरक्षेसंदर्भातील अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत कंबोडियामध्ये अडकलेल्या भारतीयांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच कंबोडियात अडकलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी काय रणनीती तयार करता येईल? यासंदर्भात चर्चा झाली.'इंडियन एक्स्प्रेस'ने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात म्हटले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पार पडलेल्या या बैठकीचा अजेंडा हा या रॅकेटसंदर्भात चर्चा करणे आणि तेथे अडकलेल्या लोकांना परत आणणे हा होता. तसेच गेल्या सहा महिन्यांत कंबोडियामधून सायबर फसवणुकीतून भारतात ५०० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.डेटा एन्ट्री सारख्या नोकरीचा बहाणा देत काही एजंट लोकांमार्फत कंबोडियाला पाठवले जात असल्याचे आतापर्यंत झालेल्या काही गुन्ह्याच्या माध्यमांतून केंद्रीय यंत्रणांच्या तपासात उघड झाले आहे. त्यानंतर फसवणूक झालेल्या व्यक्तीला सायबर फसवणूक करण्यास भाग पाडले. यामध्ये बहुतांश लोक दक्षिणेकडील असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो.गेल्या वर्षी ३० डिसेंबर रोजी ओडिशा पोलिसांनी सायबर क्राईमचा पर्दाफाश केला होता. त्यावेळी एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आले होते. कंबोडियामध्ये लोकांना नेण्यासाठी सहभागी असलेल्या आठ जणांना अटक करण्यात आली होती. या कारवाई संदर्भात एका अधिकाऱ्याने माहिती देताना म्हटले होते की, केंद्र सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या तक्रारीवर हे प्रकरण आधारित आहे. त्याची तब्बल ७० लाख रुपयांची फसवणूक झाली होती. यानंतर आम्ही देशाच्या विविध भागातून आठ जणांना अटक केली. यानंतर या घोटाळ्यात सहभागी असलेल्या अनेकाविरुद्ध नोटीसा जारी केल्या होत्या.कंबोडिया अडकलेल्यांपैकी आतापर्यंत तिघांना पुन्हा भारतात आणण्यात यश आल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले होते. कर्नाटक सरकारच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, कंबोडियामध्ये अडकलेल्या राज्यातील तीन लोकांना भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने बाहेर काढण्यात यश आले.

### तब्बल 200 लोक कंबोडियात अडकले

» गेल्या वर्षी ३० डिसेंबर रोजी ओडिशा पोलिसांनी सायबर क्राईमचा पर्दाफाश केला होता. त्यावेळी एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आले होते. कंबोडियामध्ये लोकांना नेण्यासाठी सहभागी असलेल्या आठ जणांना अटक करण्यात आली होती. या कारवाई संदर्भात एका अधिकाऱ्याने माहिती देताना म्हटले होते की, केंद्र सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या तक्रारीवर हे प्रकरण आधारित आहे. त्याची तब्बल ७० लाख रुपयांची फसवणूक झाली होती. यानंतर आम्ही देशाच्या विविध भागातून आठ जणांना अटक केली. यानंतर या घोटाळ्यात सहभागी असलेल्या अनेकाविरुद्ध नोटीसा जारी केल्या होत्या.डेटा एन्ट्री सारख्या नोकरीचा बहाणा देत काही एजंट लोकांमार्फत कंबोडियाला पाठवले जात असल्याचे आतापर्यंत झालेल्या काही गुन्ह्याच्या माध्यमांतून केंद्रीय यंत्रणांच्या तपासात उघड झाले आहे. त्यानंतर फसवणूक झालेल्या व्यक्तीला सायबर फसवणूक करण्यास भाग पाडले. कंबोडियामध्ये अडकलेल्या राज्यातील तीन लोकांना भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने बाहेर काढण्यात यश आले. मात्र, ज्या तिघांना पुन्हा भारतात आणण्यात आले त्यांनी सांगितले होते की, तब्बल २०० लोक कंबोडियात अडकले आहेत.

# करोना काळात थाळ्या वाजवायला का सांगितलं?

## प्रसिद्ध उद्योगपती बिल गेट्स यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी साधला संवाद

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तीन वर्षांपूर्वी देशात करोनानं थैमान घातलं होतं. या काळात आरोग्य यंत्रणेपासून प्रशासकीय व्यवस्थेपर्यंत सर्वांवरच प्रचंड मोठं दडपण, जबाबदारी आणि भीतीचं वातावरण पाहायला मिळत होतं. या काळात प्रत्येकजण आपापल्या परीने करोनाचा सामना करण्याचा प्रयत्न करत होता. सर्व राज्य सरकारे व केंद्र सरकारही यासंदर्भात वेगवेगळ्या प्रकारे लढा देण्याचा प्रयत्न करत होते.**

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोशल मीडिया लाईव्हच्या माध्यमातून देशवासीयांना थाळ्या वाजवण्याचं, टाळ्या वाजवण्याचं किंवा दिवे लावण्याचं आवाहन केलं होतं. यावर त्यावेळी बरीच चर्चाही झाली होती. त्याचं कारण मोदींनी स्पष्ट केलं आहे. प्रसिद्ध उद्योगपती बिल गेट्स यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संवाद साधला. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर, एआय अशा मुद्द्यांसह करोना काळातील व्यवस्थापनावरही मोदींनी भाष्य केलं. करोना काळात भारतातील परिस्थितीचं नियोजन कसं केलं? अशी विचारणा बिल गेट्स यांनी केली असता मोदींनी त्याच्या उत्तरादाखल त्यावेळी कोणत्या धोरणाने मार्गक्रमण केलं, याविषयी माहिती दिली."मी



करोना विषाणूविरोधातली लढाई आपल्या सगळ्यांची आहे यासंदर्भात लोकांमध्ये जनजागृती करण्यावर भर दिला. ही लढाई 'विषाणू विरुद्ध सरकार' अशी नसून ती 'आपलं आयुष्य विरुद्ध विषाणू' अशी लढाई आहे ही माझी भूमिका होती. त्याशिवाय मी पहिल्या दिवसापासून देशातील सगळ्यांशी चर्चा करत होतो. मी स्वत: सगळे नियम पाळून त्यातून लोकांसमोर उदाहरण ठेवलं", असं मोदी बिल गेट्स यांना म्हणाले. दरम्यान, यावेळी मोदींनी त्यांच्या थाळीनाद किंवा दिवे लावण्याच्या आवाहनाबाबत भूमिका स्पष्ट केली. "मी तेव्हा सांगितलं टाळ्या वाजवा, थाळ्या वाजवा, दिवे लावा. आमच्या देशात यावर चेष्टा-मस्करी करण्याचा प्रयत्न झाला. पण मला लोकांना विश्वासात घ्यायचं होतं की आपल्याला ही लढाई एकत्र लढायची आहे. तेव्हा हा विश्वास निर्माण झाला की आपल्याला आपलं आयुष्य वाचवतानाच इतरांचं आयुष्य वाचेल यासाठीही प्रयत्न करायचे आहेत. मग ती एक प्रकारे व्यापक चळवळ झाली. त्यामुळे नंतर मी देशवासीयांना जे काही सांगायचो, त्याचा स्वीकार व्हायचा. मला कुणी विचारायचं नाही की मास्क लावायला पाहिजे की नाही",.बळाचा वापर करून काम होत नाही. तुम्ही लोकांना माहिती द्या, त्यांच्याशी संवाद साधा आणि त्यांना सोबत घेऊन चला.

### मी लोकांसमोर उदाहरण ठेवलं

» मला लसीकरणात मोठी मदत झाली. कुणीही मला थांबवलं नाही. आर्थिकदृष्ट्या मला अनेक समस्या आल्या. कारण मला लस बनलण्यासाठी संशोधन करायचं होतं. त्यानंतर लोकांना विश्वास द्यायचा होता की ही लस काम करेल. मग मी स्वत: लस घ्यायला गेलो. माझ्या आईचं तेव्हा ९५ वय होतं. त्यांनीही जाहीरपणे लस घेतली. यातून मी लोकांसमोर उदाहरण ठेवलं. तीन वर्षांपूर्वी देशात करोनानं थैमान घातलं होतं. या काळात आरोग्य यंत्रणेपासून प्रशासकीय व्यवस्थेपर्यंत सर्वांवरच प्रचंड मोठं दडपण, जबाबदारी आणि भीतीचं वातावरण पाहायला मिळत होतं.

# क्रितीनं पुलकितचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले



अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि अभिनेता पुलकित सम्राट यांचा लग्नसोहळा काही दिवसांपूर्वी पार पडला. या दोघांचा विवाह सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशताच आता लग्नाच्या काही दिवसानंतर पुलकितनं त्याच्या सासुरवाडीत एक खास पदार्थ बनवला आहे. पुलकितनं बनवलेल्या पदार्थाचे फोटो क्रितीनं सोशल मीडियावर शेअर केले आहेत.क्रितीनं पुलकितच्या किचनमधील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये पुलकित हा हलवा बनवताना दिसत आहेत. पुलकितच्या या फोटोला क्रितीनं कॅप्शन दिलं, "ग्रीन फ्लॅग अलर्ट! काल काहीतरी स्पेशल घडले, मी पुन्हा प्रेमात पडले. मला वाटत नव्हतं असं होईल, पण हे घडलं आहे" "पुलकितची पहली रसोई काल झाली. मी स्वयंपाकघरात गेले आणि मला लक्षात आले की, तो हलवा बनवत आहे. मी त्याला विचारले की तो काय करत आहे? त्याने सहजपणे उत्तर दिले, "हलवा बना रहा हूं, यह मेरी पहली रसोई आहे." मी हसून त्याला म्हणाले,"पहली रसोई लाडकी की होती है बेबी." ज्यावर त्यांची प्रतिक्रिया होती, "तू आपल्या कुटुंबासाठी दिल्लीतील घरी स्वयंपाक केला, तर मी इथे बेंगळुरूमधील आपल्या कुटुंबासाठी स्वयंपाक करतोय, सिंपल!", असंही क्रितीनं कॅप्शनमध्ये लिहिलं. पुढे पुलकितनं कॅप्शनमध्ये लिहिलं, "होय, त्याने सिंपल हा शब्द वापरला. त्यामुळे सहजतेने त्याने आजूबाजूच्या सर्व गोष्टी बदलल्या . सर्व प्रामाणिकपणे तो करत होते. पुलकित सम्राट, तू माझ्या आयुष्यातील सर्वात चांगला माणूस आहेस. तू सब्र का फल है बेबी, सबसे मीठा!"

# आलियाला नमस्कार; वहिनी अशी हाक

बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्ट गुरुवारी लंडनमध्ये चॅरिटी गाला होस्ट केला. अभिनेत्री त्याआधी विमानतळावर दिसली. यावेळी तिने चाहत्यांबरोबर सेल्फी काढले. याचबरोबर तिने पापाराझींना पोज दिल्यात इतक्यात गर्दीतून तिला मराठीत कुणीतरी आवाज दिला. त्यावर तिने दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आहे. इंटरनेटवर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये आलिया विमानतळाच्या गेटकडे जाताना दिसते. त्यावळे एक पापाराझी म्हणाला, 'वहिनी नमस्कार.' हे ऐकताच आलियाने कॅमेऱ्याकडे पाहिले आणि हसली. गोड स्माइल दिल्यानंतर ती पुढे निघून गेली. तिचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. आलियाचा हा व्हिडीओ पाहून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. काहींनी आलियाचं हास्य सुंदर आहे, असं म्हटलं आहे. अनेकांनी या व्हिडीओवर रेड हार्ट इमोजी कमेंट केले आहेत. आलियाच्या या व्हिडीओची सोशल मीडियावर खूप चर्चा आहे.हर्षदीप कौर, कॉमेडियन रोहन जोशी आणि कोरिओग्राफर उषा जे यांनी होप गालामध्ये परफॉर्म केलं. हा कार्यक्रम लंडनमधील मँडारिन ओरिएंटल हाइड पार्क इथं पार पडला. सलाम बॉम्बे या संस्थेला मदत करणे हे होप गालाचे उद्दिष्ट आहे, त्यासाठीच हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.आलियाच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास नुकतंच तिने वेदांग रैनाबरोबर 'जिगरा' या चित्रपटाचं शूटिंग पूर्ण केलं. या चित्रपटाचं दिग्दर्शन वासन बाला करत आहेत. हा चित्रपट सप्टेंबर २०२४ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. आलिया करण जोहरच्या 'रॉकी और रानी की प्रेम कहानी'मध्ये शेवटची दिसली होती. रणवीर सिंगचीही भूमिका असलेला हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला होता.बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्ट गुरुवारी लंडनमध्ये चॅरिटी गाला होस्ट केला. अभिनेत्री त्याआधी विमानतळावर दिसली. यावेळी तिने चाहत्यांबरोबर सेल्फी काढले. याचबरोबर तिने पापाराझींना पोज दिल्यात इतक्यात गर्दीतून तिला मराठीत कुणीतरी आवाज दिला.चर्चेत आहेव्हिडीओमध्ये आलिया विमानतळाच्या गेटकडे जाताना दिसते.



# रजनीकांत यांचा जबरदस्त लूक

मास्टर विक्रम आणि लिओ यांसारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांचे दिग्दर्शन करणारे लोकेश कनागराज यांच्या थलायवर ) या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. सुपरस्टार रजनीकांत स्टार या चित्रपटाची सध्या सोशल मीडियावर चर्चा होत आहे. थलायवर 171 या चित्रपटातील रजनीकांत यांचा जबरदस्त लूक रिलीज करण्यात आला आहे. या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.डोळ्यावर गॉगल, हातात चार घड्याळं आणि चेहऱ्यावर ॲटिट्युड असा थलायवर 171 मधील रजनीकांत यांचा लूक रिलीज करण्यात आला आहे. थलायवर 171 या चित्रपटातील रजनीकांत यांचा लूक लोकेश कनागराज यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे.गेल्या वर्षी रजनीकांत यांचा जेलर हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर कोट्यवधींची कमाई केली. तसेच त्यांचा लाल सलाम हा चित्रपट देखील प्रेक्षकांच्या भेटीला आला. आता प्रेक्षक त्यांच्या थलायवर 171 या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. लोकेश कनागराज आणि रजनीकांत यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये थलायवर 171 या चित्रपटाची घोषणा केली होती. या चित्रपटाची अजून रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली नाही.

# कमलेश अवस्थींचं निधन

मुकेश यांचा आवाज अशी ओळख मिळालेले गायक कमलेश अवस्थी यांचं अहमदाबादमध्ये निधन झालं आहे. मागच्या एक महिन्यापासून ते कोमामध्ये होते. आज त्यांची प्राणज्योत मालवली. 'गोपीचंद जासूस' या सिनेमात कमलेश अवस्थी यांनी राज कपूर यांच्यासाठी पार्श्वगायन केलं होतं. 'तेरा साथ है तो..', 'जिंदगी इम्तिहान लेती है..' ही त्यांची गाणी विशेष गाजली.



# अमृता खानविलकरला शिक्षणाची ओढ!

मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री अमृता खानविलकर हिनं हिंदी सिनेसृष्टीत देखील विशेष ओळख निर्माण केली आहे. तिनं 'राझी', 'सत्यमेव जयते' आणि 'मलंग' या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. आता तिची लुटेरे ही वेब सीरिज प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. या वेब सीरिजमधील तिनं साकारलेली "अविका " ही प्रेक्षकांची मनं जिंकत आहे. लुटेरे वेब सीरिजनंतर आता अमृताने तिला पुढे काय करायचंय? याबद्दल प्रेक्षकांना एक छोटी हिंट दिली आहे. ही खास गोष्ट नक्की काय आहे? हे बघायला सगळेच उत्सुक आहेत. 'लुटेरे' मधील अमृताच्या अभिनयाचं कौतुक होतंय. प्रत्येक कलाकाराला अभिनायच्या पलिकडे जाऊन आपण काहीतरी वेगळं करावं असं नक्कीच वाटून जात आणि असंच काही अमृताच्या बाबतीत घडतंय! अमृता सध्या "लुटेरे" चं प्रमोशन करत आहे. अश्याच एका प्रमोशन दरम्यान अमृताने तिला आयुष्यात अजून काहीतरी खास करायचं आहे याबद्दल सांगितल.शिक्षणाबद्दल सांगताना अमृता म्हणते, "अभिनय नवनवीन भूमिका प्रोजेक्ट्स सगळंच होत राहणार आहे पण मला अभिनयाच्या सोबतीने मास्टर्स सुद्धा करायचं आहे. मास्टर्स इन लिटरेचर किंवा इन फायनस हे अजून ठरवलं नाही पण मास्टर्स करण्याची माझी इच्छा आहे. आपण वर्षभर काम करत असतो पण स्वतः हासाठी काहीतरी करावं म्हणून मला मास्टर्स करण्याची खूप इच्छा आहे"

# आपल्या खेळाडूंचा आदर केला पाहिजे!

## सोनू सूदने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले मत मांडले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ च्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वीपासून ते आतापर्यंत तीन अशी नावे आहे, जी प्रचंड चर्चेत आहेत. यामध्ये हार्दिक पंड्या, रोहित शर्मा आणि मुंबई इंडियन्स या तीन नावाचा समावेश आहे. आयपीएलच्या सतराव्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला गुजरात टायटन्सकडून ट्रेड विंडोच्या माध्यमातून खरेदी केले आणि आपल्या संघात सामील केले. यानंतर मुंबई इंडियन्स रोहित शर्माला कर्णधारपदावरून हटवून संघाची धुरा हार्दिक पंड्याच्या खांद्यावर सोपवली. तेव्हापासून हार्दिक पंड्या आणि मुंबई इंडियन्सला आजपर्यंत चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. तसेच हार्दिकला सामना दर सामना मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करणे कठीण होत चालले असताना, अभिनेता सोनू सूदची एक पोस्ट सध्या चर्चेत आहे.**



कोरोना काळापासून अभिनेता सोनू सूदचं फॉलोइंग प्रचंड वाढल आहे. कारण या महामारीच्या काळात तो अनेक गरजवंताना मदत करण्यासाठी पुढे आला होता. त्याने महामारीच्या काळात आपल्या स्वत:च्या पैशातून अनेकांना मदत केली होती. आता त्याने आयपीएलमध्ये चाहत्यांनी हार्दिक पंड्याच्या नेतृत्वावरुन घातलेल्या गोंधळावर कोणत्याही खेळाडूचे नाव न घेता आपले मते मांडले आहे.आयपीएल २०२४ मध्ये सुरु असलेल्या गोंधळावर शुक्रवारी अभिनेता सोनू सूदने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले मत मांडले. सोनू सूदने एक्सवर एक पोस्ट शेअर करताना लिहिले,“आपण आपल्या खेळाडूंचा आदर केला पाहिजे. ज्या खेळाडूंनी आपल्या देशाच अभिमान वाटला, ज्या खेळाडूंनी आपल्या देशाचा गौरव केला. एके दिवशी तुम्ही त्यांचा जयजयकार करता, दुसऱ्या दिवशी तुम्ही त्यांच्यावर टीका करता. यामुळे ते नाही तर आपणच अपयशी होतो. मला क्रिकेट आवडते. माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करणारा प्रत्येक क्रिकेटपटू मला आवडतो. तो कोणत्या फ्रेंचायझीसाठी खेळतो हे महत्त्वाचे नाही. तो कर्णधार म्हणून खेळतो किंवा संघातील १५ वा खेळाडू आहे याने काही फरक पडत नाही. ते आपले हिरो आहेत.”चाहते प्रत्येक सामन्यात ट्रोल करत असल्याने हार्दिक पंड्याला सामना दर सामना मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करणे कठीण होत चालले आहे. पहिल्या सामन्यात जोरदार खेळी करणाऱ्या हार्दिक पंड्या दुसऱ्या सामन्यात कर्णधार म्हणून पूर्णपणे अपयशी ठरला. सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजांनी स्फोटक खेळी खेळताना हार्दिकला शस्त्र खाली ठेवण्यास भाग पाडले. सनरायझर्स हैदराबादने पहिल्या ११ षटकांत १६० धावांचा टप्पा ओलांडला होता, त्यामुळे हार्दिक पंड्याला त्याच्या माजी कर्णधाराची मदत घ्यावी लागली आणि सामन्याच्या मध्यावर रोहित शर्मा स्वतः क्षेत्ररक्षण सेट करताना दिसला. यादरम्यान त्याने हार्दिकला सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करण्यासाठी पाठवतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता.

आयपीएल २०२४ मध्ये सुरु असलेल्या गोंधळावर शुक्रवारी अभिनेता सोनू सूदने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले मत मांडले. सोनू सूदने एक्सवर एक पोस्ट शेअर करताना लिहिले, “आपण आपल्या खेळाडूंचा आदर केला पाहिजे. ज्या खेळाडूंनी आपल्या देशाच अभिमान वाटला, ज्या खेळाडूंनी आपल्या देशाचा गौरव केला. एके दिवशी तुम्ही त्यांचा जयजयकार करता, दुसऱ्या दिवशी तुम्ही त्यांच्यावर टीका करता. यामुळे ते नाही तर आपणच अपयशी होतो. मला क्रिकेट आवडते. माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करणारा प्रत्येक क्रिकेटपटू मला आवडतो. तो कोणत्या फ्रेंचायझीसाठी खेळतो हे महत्त्वाचे नाही. तो कर्णधार म्हणून खेळतो किंवा संघातील १५ वा खेळाडू आहे याने काही फरक पडत नाही. ते आपले हिरो आहेत.

### पंड्या कर्णधार म्हणून अपयशी

» ”चाहते प्रत्येक सामन्यात ट्रोल करत असल्याने हार्दिक पंड्याला सामना दर सामना मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करणे कठीण होत चालले आहे. पहिल्या सामन्यात जोरदार खेळी करणाऱ्या हार्दिक पंड्या दुसऱ्या सामन्यात कर्णधार म्हणून पूर्णपणे अपयशी ठरला. सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजांनी स्फोटक खेळी खेळताना हार्दिकला शस्त्र खाली ठेवण्यास भाग पाडले. आयपीएल २०२४ च्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वीपासून ते आतापर्यंत तीन अशी नावे आहे, जी प्रचंड चर्चेत आहेत. यामध्ये हार्दिक पंड्या, रोहित शर्मा आणि मुंबई इंडियन्स या तीन नावाचा समावेश आहे. आयपीएलच्या सतराव्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला गुजरात टायटन्सकडून ट्रेड विंडोच्या माध्यमातून खरेदी केले आणि आपल्या संघात सामील केले.

# पंड्याने लसिथ मलिंगाला ढकलल्याने चाहते संतापले

## पंड्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या सध्या आयपीएल २०२४ मध्ये चर्चेचा केंद्रबिंदू आहे. हार्दिक पंड्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामुळे तो पुन्हा एकदा वादात सापडला आहे. हार्दिक पंड्याच्या या व्हिडीओने सोशल मीडियावर खळबळ उडवून दिली आहे. या व्हिडीओमध्ये हार्दिक पंड्या संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगाला धक्का देत असल्याचे चाहत्यांचे मत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने चाहते हार्दिक पंड्याला सतत ट्रोल करत आहेत.**



सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यात झालेल्या सामन्यात ही घटना घडली. सामना संपल्यानंतर दोन्ही संघांचे खेळाडू एकमेकांशी हस्तांदोलन करत असताना मुंबई इंडियन्सचा गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगा हस्तांदोलन आणि मिठी मारण्यासाठी हार्दिक पंड्याकडे गेला, पण त्यावेळी हार्दिक लसिथ मलिंगाला बाजूला ढकलताना दिसला. हार्दिक पंड्याने लसिथ मलिंगाशी हस्तांदोलन केले नाही आणि त्याच्याकडे दुर्लक्ष करताना दिसला. यावेळी लसिथ मलिंगाचा चेहराही उदास दिसत होता.त्यानंतर हार्दिक पंड्या इतर खेळाडूंशी हस्तांदोलन करुन पुढे निघून गेला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. ज्यामुळे पुन्हा एकदा हार्दिक पंड्याला चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

आयपीएल २०२४ च्या मोसमाची सुरुवात मुंबई इंडियन्ससाठी खूपच भयानक झाली आहे. मुंबई इंडियन्सला त्यांच्या पहिल्या दोन सामन्यांत सलग दोन पराभवांचा सामना करावा लागला आहे.मुंबई इंडियन्सचा पहिल्या सामन्यात गुजरात टायटन्सकडून पराभव झाला होता. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा सनरायझर्स हैदराबादकडून पराभव झाला.

### पंड्या पुन्हा एकदा वादात

» मुंबई इंडियन्स संघ गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२४ मध्ये हार्दिक पड्याला आपला कर्णधार बनवले आणि आतापर्यंत त्याच्या नेतृत्वाखाली संघाची कामगिरी खूपच खराब झाली आहे.मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या सध्या आयपीएल २०२४ मध्ये चर्चेचा केंद्रबिंदू आहे. हार्दिक पंड्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामुळे तो पुन्हा एकदा वादात सापडला आहे. हार्दिक पंड्याच्या या व्हिडीओने सोशल मीडियावर खळबळ उडवून दिली आहे. या व्हिडीओमध्ये हार्दिक पंड्या संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगाला धक्का देत असल्याचे चाहत्यांचे मत आहे. हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यात झालेल्या सामन्यात ही घटना घडली.